# Prahar

## Tata AIG Life Insurance

**Date: 15-05-2009 | Edition: Mumbai | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 6 H: 6**



### टाटा एआयजीचा करार

टाटाएआयजी लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने आंध्र प्रदेशातील विमाधारकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठी एपी ऑनलाइन या कंपनीशी करार केला आहे. एपी ऑनलाइन कंपनीच्या पोर्टलद्वारे आंध्र प्रदेशातील पॉलिसीधारकांना प्रिमियम भरण्याची सुविधा टाटा एआयजी देणार आहे. एपी ऑनलाइन ही कंपनी सरकारी सेवा राज्यातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. त्यासाठी कंपनीने 'सिटीझन ऑनलाइन सर्व्हिसेस'सारखे ऑनलाइन डिलिव्हरी चॅनल्स तयार केले आहेत. सध्या एपी ऑनलाइनची आंध्र प्रदेशात एक हजार २०० केंद्रे आहेत.